सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल

## श्री. अली यावर जंग

यांचे

# अभिभाषण

२ मार्च १९७०

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज व सन्माननीय सदस्य,

महाराष्ट्राच्या राज्यपालाचे पद धारण केल्यानंतर आज प्रथमच विधानमंडळाच्या संयुक्त अधिवेशनापुढे भाषण करण्याचा सन्मान आणि सुयोग मला लाभत आहे. मी आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

२. सन्माननीय सदस्य, बरीच वर्षे परदेशी घालवल्यानंतर परत आपल्या माणसांत येताना मला फार आनंद होत आहे. देशातील घडामोडींकडे मी नेहमीच मोठ्या आस्थेने पहात आलो आहे. विकासविषयक कार्याबाबत आपल्या व्यवहारी आणि वास्तववादी दृष्टिकोनासाठी महाराष्ट्र राज्याची ख्याती आहे, पण त्याबरोबरच सामान्य माणसाला खऱ्याखुऱ्या अर्थाने आर्थिक स्वातंत्र्य व सामाजिक न्याय मिळवून देण्याकरिता प्रगतिशील आणि दूरदर्शी उपाययोजना आखण्यातही महाराष्ट्राने भरीव कामगिरी केली आहे, याची मला जाणीव आहे. गेल्या काही वर्षांत शासनाने आपल्या घोषित धोरणांची अंमलबजावणी मोठ्या जोमाने केली आहे, हे सांगताना मला आनंद होत आहे. सर्व लोकांना शिक्षणाची जास्तीतजास्त आणि अधिक समान संधी प्राप्त करून देण्यासाठी शिक्षणविषयक धोरणात सुधारणा करणे, अनेक लहान लहान शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण उत्पादक बनवण्याच्या उद्देशाने अल्पभूमिधारकांचे गट प्रबल करणे, वेगाने होणाऱ्या नागरीकरणाच्या अनुषंगाने येणाऱ्या अपरिहार्य दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने महानगरांच्या समस्या सोडवण्यासाठी कल्पक आणि दमदार उपाययोजना करणे, त्याचप्रमाणे, एकंदर देशाच्या हिताच्या दृष्टीने उद्योगांचा विस्तार व विकेंद्रीकरण अधिक गतीने होण्यासाठी दाट वस्तीच्या मुंबई बेटामधून काही अर्थोत्पादक उद्योगधंदे व लोकसंख्या नवीन महानगर केंद्रांकडे नेणे यांसारख्या कितीतरी नवीन व प्रगतिशील उपाययोजना या राज्याने हाती घेतल्या आहेत.

३. विकासविषयक नियोजनाच्या क्षेत्रामध्ये शासनाने घेतलेल्या एका महत्त्वाच्या निर्णयाबद्दल आवर्जून सांगितले पाहिजे. राज्याच्या निरनिराळ्या भागांचा समतोल विकास करण्याच्या दृष्टीनेच नाही तर, राज्यातील विशिष्ट प्रदेशांचा आणि भागांचा विकास करण्याऐवजी संपूर्ण राज्याचा एकाच वेळी विकास करण्याचा सयुक्तिक दृष्टिकोनही त्यामध्ये स्वीकारला गेल्यामुळे या निर्णयाला खरेखुरे महत्त्व आहे. भविष्यकाळात 'जिल्हा' हा नियोजनाचा मूलभूत घटक ठरवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे, प्रत्येक जिल्ह्यासाठी १५ वर्षांच्या कालावधीकरिता यथार्थदर्शी योजना आखण्याचेही शासनाने ठरवले आहे. मूलभूत सामाजिक व आर्थिक सोयी व उत्पादनक्षम साधने यांच्या संबंधात निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये किंवा एकाच जिल्ह्यातील निरनिराळ्या भागांमध्ये ज्या उणिवा आढळतील त्या भरून काढणे हे या यथार्थदर्शी योजनांचे उद्दिष्ट असेल. (अ) जिल्ह्याजिल्ह्यांतील किंवा एकाच जिल्ह्याच्या निरनिराळ्या भागांतील आर्थिक असमतोल कमी करणे,

व (ब) राज्य योजनेची उद्दिष्टे व साधनसंपत्ती यांच्या एकूण चौकटीमध्ये जिल्ह्यातील जनतेने व्यक्त केलेल्या आकांक्षांचा जिल्हा योजनांत जास्तीत जास्त प्रमाणात समावेश करणे, हे पंधरा वर्षांची यथार्थदर्शी राज्य योजना व जिल्हा योजना यांचे प्रमुख उद्दिष्ट राहील. त्याचप्रमाणे सर्व जिल्ह्यांच्या भूमिगत नैसर्गिक संपत्तीची संपूर्णतया मोजमापणी करण्यासाठी अर्हताप्राप्त तांत्रिक पथकांद्वारे तांत्रिक-आर्थिक पाहणी करण्याचेही योजिले आहे.

४. राज्याच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेची व्याप्ती अद्याप जरी निश्चित झाली नसली तरी, चौथ्या योजनेच्या खर्चाचा तात्पुरता अंदाज सुमारे रुपये १,००० कोटी इतका आहे. हा खर्च भागवण्याच्या दृष्टीने वित्तीय साधनसंपत्तीचा अंतिम अंदाज पुरेसा असेल, असा शासनाला विश्वास आहे.

५. तारापूर अणुशक्ति केंद्र सुरू होणे ही या वर्षातील उल्लेखनीय घटना आहे. त्यामुळे, या राज्यातील उपलब्ध वीज-पुरवठ्यामध्ये सुमारे १९० मेगॅवॅटची भर पडली आहे. नाशिक व परळी येथील अनुक्रमे २८० मेगॅवॅट व ६० मेगॅवॅट वीज निर्माण करण्याची अंदाजित क्षमता असलेली औष्णिक वीज निर्मिति केंद्रे १९७० मध्ये सुरू होतील, अशी अपेक्षा आहे. तसेच, विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन नागपूर विभागामध्ये कोराडी येथे कोळशावर चालणाऱ्या औष्णिक वीज केंद्राच्या कामाला गती देण्याचेही ठरवले आहे. उद्योगांच्या वाढत्या गरजांखेरीज खेड्यांचे विद्युतीकरण आणि कृषि पंपांसाठी वीज पुरवणे यांकडेही खास लक्ष दिले गेले आहे.

६. महाराष्ट्रात वाहत्या पाण्यावर पाटबंधारे बांधण्याची एकूण संभाव्यता मर्यादित असली तरीही, अनेक पाटबंधारे प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे १९६८–६९ मध्ये पाटबंधाऱ्यांखालील एकूण क्षेत्र ३७ लाख एकर (निव्वळ) होते ते १९६९–७० मध्ये ४१$\frac{१}{२}$ लाख (निव्वळ) एकरांपर्यंत वाढले आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये पद्धतशीरपणे सहकारी उद्धरण सिंचन योजना तयार करण्याचे व त्या कार्यान्वित करण्यासाठी संस्थांचे वित्तसहाय्य संघटित करून ते कामी लावण्याचे प्रस्तावित केले आहे.

७. राज्याच्या कृषिविषयक धोरणामध्ये (१) भूमिविकासाचे कार्यक्रम, (२) जमिनीला जास्तीत जास्त व निश्चित पाणीपुरवठा करणे आणि (३) अधिक पीक देणारी बियाणे, खते व जंतुनाशके यांसारख्या मूलभूत कृषिविषयक सामग्रीचा अधिक उपयोग करणे या गोष्टींवर सारखाच भर देण्यात आलेला आहे. दोन नवीन कृषि विद्यापीठे स्थापन झाली आहेत. कृषिविषयक प्रशिक्षण, संशोधन व विस्तार कार्य यांच्या सोयी वाढवणे आणि राज्याचा कृषिव्यवसाय हा वैज्ञानिक व तर्कशुद्ध पायावर आधारलेला लाभकारी व्यवसाय बनवण्याच्या कार्यास गती देणे यासाठी या विद्यापीठांची मदत होईल.

८. पुरेपूर मोबदला देणारी खात्रीलायक बाजारपेठ उपलब्ध असणे हे वाढत्या कृषि उत्पादनासाठी अत्यंत प्रभावी प्रोत्साहन ठरते. प्रमुख शेतमालांच्या किंमती ठरवण्याचा प्रश्न प्रामुख्याने केंद्र सरकारच्या कक्षेत येत असला तरीही, शेती उत्पादन वाढण्याच्या दृष्टीने हा प्रश्न राज्य शासनाला अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो. म्हणून, शासनाने शेतमालांचे भाव निश्चित करण्याच्या संपूर्ण प्रश्नाचा व इतर संबंधित प्रश्नांचा विचार करण्यासाठी कृषि मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे.

९. (१) महत्त्वाच्या रस्त्यांवर खडी व डांबर टाकणे आणि (२) डोंगराळ व दुर्गम भागांमध्ये रस्ते बांधणे यांच्या विशेष योजनांना खास प्राथम्य देण्यात यावे आणि वार्षिक योजनांमध्ये व राज्याच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये त्यासाठी विशेष वाटा राखून ठेवण्यात यावा, असे शासनाने ठरवले आहे. मुंबई बेट मुख्य भू-भागाशी जोडून आसपासचा भाग आर्थिक दृष्ट्या विकसित करण्यासाठी वसई खाडीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण करून तो खुला करणे आणि ठाणे खाडीवरील पुलाचे बांधकाम जवळजवळ पूर्ण होत येणे या गोष्टी दळणवळण विकासाच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे ठरतात.

१०. एकीकडे, सप्टेंबर १९६९ मधील अतिवृष्टीमुळे व पुरामुळे अनेक जिल्ह्यांतील घरांचे व पिकांचे नुकसान होऊन १९६९–७० च्या शेतीच्या हंगामाला काही अंशी धोका पोचला, तर दुसरीकडे, पाऊस लवकर थांबल्यामुळे इतर अनेक जिल्ह्यांतील खरीप पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला. पुराच्या बातम्या मिळताच तत्काळ पूरग्रस्त लोकांना विनामूल्य सहाय्य देण्यात आले आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांना अर्थसहाय्याच्या वाढीव दरांनुसार मोठ्या रकमेची कर्जेही देण्यात आली.

११. राज्यातील अन्नधान्य परिस्थिती समाधानकारक राहिली आहे. पुणे, नागपूर व सोलापूर येथील कायदेशीर शिधावाटप पद्धती काढून टाकण्यात आली आहे. मात्र, अन्न पदार्थांच्या अकल्पित भाववाढीपासून गरीब जनतेला संरक्षण मिळावे म्हणून रास्त भाव दुकान योजना या भागांमध्ये चालू ठेवण्यात आली आहे.

१२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम), महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, लघु उद्योग विकास महामंडळ यांसारख्या शासनाने स्थापन केलेल्या सरकारी क्षेत्रातील संस्थांनी चालू वर्षी नवीन उद्योगांच्या वाढीसाठी आणि राज्याच्या अविकसित आंतर भागांमध्ये नवीन औद्योगिक घटक विखुरले जाण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या बाबतीत मौलिक कामगिरी बजावली आहे. भारत सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या परवाने देण्याच्या धोरणामुळे या राज्यातील नवीन लघुउद्योग घटकांच्या वाढीस तसेच त्यांच्या विखरणास गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.

१३. तयार उत्पादने व कच्चा शेतमाल यांच्या किंमतीतील मोठी तफावत कमी करण्यासाठी, शेतकऱ्यांना, त्यांच्या उत्पादनाचे संस्करण सहकारी तत्त्वावर करण्याकरिता सहाय्य देण्याच्या आपल्या धोरणामध्ये शासनाने कृषि–औद्योगिक विकासास अग्रक्रम दिला आहे. सहकारी साखर कारखान्यांना अधिक परवाने देण्याच्या राज्य शासनाच्या तातडीच्या मागणीस भारत सरकारने प्रतिसाद दिला आहे आणि या वर्षात १५ परवाने देण्यात आले आहेत.

१४. अल्पभूमिधारकांचा गट स्थापन करण्यासंबंधी आपल्या राज्यानेच प्रथम सुरू केलेल्या योजनेचे अनुकरण आता अखिल भारतीय पातळीवर इतर राज्यांकडून केले जात आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे. सामायिक विहिरीसारख्या पाणीपुरवठ्याच्या सोयी करण्यासाठी किंवा दुग्धशाळा, कुक्कुटपालन, मेंढ्यांची व बकऱ्यांची पैदास वगैरे दुय्यम व्यवसाय वाढवण्यासाठी अल्पभूमिधारकांना इतरांच्या तुलनेने अधिक प्रमाणात अर्थसहाय्य देऊन कर्जपुरवठा करणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. कालांतराने अल्पभूमिधारक आपला धंदा किफायतशीर रीतीने चालवण्यास समर्थ व्हावेत हा या मागील हेतू आहे.

१५. प्रगतिशील समाजाच्या बदलत्या आर्थिक व सामाजिक गरजा भागवण्यासाठी आणि त्याच्या आशाआकांक्षा पुऱ्या करण्यासाठी सर्व स्तरांवर शिक्षणाची पुनर्रचना करण्याच्या नियोजित धोरणाची मूलतत्त्वे दाखवणारी एक शिक्षणविषयक श्वेतपत्रिका शासनाने एप्रिल १९६८ मध्ये प्रसिद्ध केली. सर्व बाजूंचा सखोल विचार करून शासनाने आता शिक्षणाच्या पुनर्रचनेसंबंधीचे नवे धोरण पक्के केले आहे. सर्व स्तरांवर शिक्षणाच्या सोयींमध्ये वाढ करण्याची गरज जाणणे, आर्थिक व सामाजिक दृष्टचा मागास व अविकसित प्रदेशांना व गटांना शिक्षणाची समान संधी मिळवून देणे व शिक्षणाचा दर्जा उंचावण्यावर भर देणे ही या धोरणाची ठळक वैशिष्टचे आहेत. या पंधरा वर्षांच्या शैक्षणिक योजनेमध्ये इतर गोष्टींबरोबरच पुढील गोष्टींचाही अंतर्भाव असेल. या गोष्टी म्हणजे सबंध राज्यात शिक्षणाची एकरूप पद्धती आखणे, गणित व शास्त्र या विषयांचे नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, शिक्षकांच्या प्रशिक्षणासंबंधी तातडीचा कार्यक्रम हाती घेणे, इयत्ता पाचवी-पासून इंग्रजी हा सक्तीचा विषय म्हणून सुरू करणे, (माध्यमिक शिक्षणानंतर) व्यावसायिक शिक्षण व तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी अधिक सोयी उपलब्ध करून देणे आणि वन्य जमाती व अनुसूचित क्षेत्रांमध्ये व स्त्रीवर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी खास प्रोत्साहन देणे.

हे धोरण कार्यान्वित करण्यासाठी प्रारंभिक उपाय योजण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनु-षंगाने शिक्षणाची विविध अंगे विचारात घेऊन सर्वसमावेशक कायद्याचा मसुदा लवकरच सभागृहापुढे मांडण्याचे ठरविले आहे.

१६. महात्मा गांधी जन्मशताब्दि महोत्सवाचा भाग म्हणून या राज्यामध्ये हाती घेतलेल्या कार्यक्रमांना समाजातील विविध स्तरांमधून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ग्रामीण क्षेत्रासाठी व समाजातील दुर्बल वर्गासाठी मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त करण्याच्या कार्यक्रमांकडे व कार्यानुसारी साक्षरता मोहिमे-कडे विशेष लक्ष पुरवण्यात आले आहे. लोकांच्या उन्नतीसाठी प्रत्यक्ष कार्य करून स्थानिक प्राधि-करणांनी व स्वेच्छेने समाजकार्य करणाऱ्या संस्थांनी राष्ट्रपित्याला आपली श्रद्धांजली अर्पण केली आहे. गांधीजींचे जीवन व त्यांचा संदेश नव्या पिढीला समजावून सांगून या पिढीमध्ये समाज-कार्याची आवड निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत.

१७. अर्थोत्पादक उद्योगधंदे आणि उद्योगाशी संबंधित असलेली प्रचंड लोकसंख्या यांचे मुंबई बेटाच्या सीमित क्षेत्रामध्ये केंद्रीकरण झाल्यामुळे, पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूक व दळणवळण आणि वीज वगैरे शहराच्या मूलभूत गरजा भागविणाऱ्या सोयींवरही कमालीचा ताण पडला आहे आणि झपाटचाने होणाऱ्या नागरीकरणामुळे अनेक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी मुंबई-ठाणे क्षेत्रातील पाणी पुरवठा वाढवण्यास मोलाची मदत करणारे भातसई प्रकल्प आणि ठाणे खाडीच्या पलीकडे एक नवे महानगर केंद्र उभारणे यांसारख्या काही निकडीच्या उपाययोजना त्वरेने पूर्ण करण्यासाठी पाऊल उचलण्यात आले आहे.

१८. वैद्यकीय व आरोग्य संवर्गांचे एकत्रीकरण करण्याच्या दीर्घकालीन मागणीनुसार या दोन विभागांची पुनर्रचना करण्यासाठी, तसेच, एक वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, आणि एक आरोग्य सेवा संचालनालय स्थापन करण्यासाठी उपाययोजना केली आहे. वैद्यकीय महाविद्यालये, अध्यापन रुग्णालये व संशोधन संस्था या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिकाराखाली येतील. जिल्हा पातळीवरील व त्याखालील वैद्यकीय व आरोग्य कर्मचारीवर्ग यांची व्यवस्था आरोग्य सेवा संचालनालयाकडे राहील. या दोन संवर्गांच्या एकत्रीकरणासंबंधीची पुढील

उपाययोजना आखण्याचे काम चालू आहे. याच्याच जोडीला, बंधपत्रित उमेदवारांना नोकऱ्या देणे आणि जिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्यातील अनुपाठ्यचाऱ्यांना (इन्टर्नना) सोयी प्राप्त करून देणारी नवीन अनुपाठ्यचर्या (इन्टर्नशिप) योजना चालू करणे, यांमुळे ग्रामीण प्रदेशात अर्हताप्राप्त अॅलोपॅथिक डॉक्टर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने फार मोठी मदत होईल. कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात या राज्याने सर्वोत्तम कामगिरीबद्दल "कर्वे पुरस्कार" आणि "जनन-अक्षमता पुरस्कार" पुन्हा एकदा मिळवले आहेत.

१९. महाराष्ट्रातील पंचायत राज्य हा लोकशाही विकेंद्रीकरणाच्या क्षेत्रातील एक महत्वाचा टप्पा आहे. पंचायत राज्य संस्था कार्यान्वित होऊन ७ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला असल्यामुळे त्यांच्या कार्यसिद्धीचे मूल्यमापन करणे व या संस्थांच्या कार्याची परिणामकारकता वाढवण्यासाठी उपाययोजना सुचवणे आवश्यक वाटले. या दृष्टीने राज्यातील पंचायत राज्याच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी शासनाने पंजाबराव कृषि विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली आहे.

२०. कापड गिरण्या बंद पडण्याच्या समस्या हाताळण्याकरिता शासनाने अल्पमुदती व दीर्घमुदती उपाययोजना हाती घेतल्या आहेत. १९ कापड गिरण्या एकतर शासनाच्या मालकीच्या आहेत किंवा भाडेपट्ट्याने घेऊन त्या शासनाकडून आणि अधिकृत नियंत्रकांच्या व्यवस्थेखाली चालवल्या जात आहेत. त्यामुळे चाळीस हजारांपेक्षा अधिक कामगारांना रोजगार मिळाला आहे. त्याचप्रमाणे, गिरण्या बंद पडल्यामुळे बेकार झालेल्या कामगारांना रोजगार देण्याकरिता मुंबईची सक्सेरिया मिल, चाळीसगाव येथील छगनलाल टेक्स्टाईल मिल्स आणि बडनेरा येथील कापड गिरणी यांचे व्यवस्थापन स्वतःकडे घेण्याकरिता शासन सर्व प्रयत्न करीत आहे. शासनाच्या प्रयत्नांमुळे या गिरण्या लवकरच पुन्हा सुरू होतील, अशी आशा आहे.

२१. औद्योगिक रोजगाराचे अधिकतर क्षेत्र किमान मजुरी अधिनियमाच्या कक्षेत आणावे व मजुरांची मजुरी वेळोवेळी निश्चित करावी आणि तिच्यामध्ये सुधारणा करावी, असे राज्य शासनाचे धोरण आहे. राज्यातील शेतमजुरांची किमान मजुरी निश्चित करण्याचा निर्णय शासनाने आता घेतला आहे. राज्यातील असंघटित कामगारांच्या मोठ्या वर्गाला या निर्णयामुळे फायदा होईल.

२२. शासनाने दोन स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचे ठरवले असून क्रीडा विभाग व सांस्कृतिक कार्य विभाग अशी त्यांची नावे राहतील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्याने, महत्त्वाच्या शहरांमध्ये क्रीडा-नि-मनोरंजन प्रेक्षागारे बांधण्यास प्रोत्साहन देण्याचे व युवकांमध्ये खेळ व क्रीडा यांची आवड उत्पन्न करण्यास चालना देण्याचे शासनाने ठरवले आहे. आपल्या लोकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा शोध घेणे, ते जतन करणे व त्यांचे संवर्धन करणे ही कार्ये आजपावेतो शासनाच्या निरनिराळ्या विभागांकडून करण्यात येत असत; त्या विविध कार्यांचे एकत्रीकरण करण्यास हा सांस्कृतिक कार्य विभाग सहाय्यभूत होईल.

२३. जून १९६८ मध्ये श्रीनगर येथे भरलेल्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या अधिवेशनामध्ये करण्यात आलेल्या सर्व शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत व त्या संपूर्णपणे कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य पातळीवरील राष्ट्रीय एकात्मता समिती व तिची स्थायी समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हा व तहसील पातळीवर एकता समित्या स्थापण्यात येत आहेत.

शांतता व एकोपा राखण्याच्या दृष्टीने आणि सर्व पातळीवरील शैक्षणिक प्रयत्नांच्या द्वारे जनतेमध्ये राष्ट्रीय ऐक्यभाव आणि एकता वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्याचा शासनाचा निर्धार आहे.

२४. म्हैसूर-महाराष्ट्र सीमा तंट्याच्या ज्वलंत प्रश्नावरील शासनाचा व विरोधी पक्षाचा दृष्टिकोन जवळजवळ सारखाच आहे, हे माननीय सदस्यांना माहितच आहे. हे प्रकरण पुष्कळ वर्षे भारत सरकारच्या विचाराधीन असले तरी आता ते निर्णायक टप्प्यावर येऊन पोचलेले आहे. या अत्यंत भावनाप्रक्षोभक प्रश्नावर निर्णय घेण्यास अधिक विलंब होऊ नये आणि सध्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी या प्रश्नाबाबत न्याय्य व रास्त तोडगा शोधून काढणे अत्यावश्यक आहे असे या शासनाने भारत सरकारला ठामपणे आवर्जून सांगितले आहे.

२५. प्रस्तुत अधिवेशनामध्ये अर्थातच १९७०-७१ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास मान्यता देण्याचे मुख्य काम करण्यात येईल. चालू अधिवेशनामध्ये पुढील विधेयके विचारार्थ व कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील :—

१. महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा उपाय विधेयक, १९७०.
२. महाराष्ट्र प्रतिबंधक स्थानबद्धता विधेयक, १९७०.
३. मुंबई मोटार स्पिरीटच्या विक्रीवरील कर आकारणीसंबंधी (सुधारणा) विधेयक, १९७०.
४. मुंबई पोलीस (सुधारणा) विधेयक, १९७०.
५. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्या नियुक्तीसंबंधी तरतूद करण्यासाठी विधेयक, १९७०.
६. मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५८ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.
७. मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, १९७०.
८. मुंबई विधानमंडळ सदस्यांचे पगार व भत्ते यांत सुधारणा करण्यासाठी विधेयक, १९७०.
९. भारतीय घटस्फोट अधिनियम, १८६९ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.
१०. मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, १९७०.
११. महाराष्ट्र जिल्हा परिषद (सुधारणा) विधेयक, १९७०.
१२. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (सुधारणा) विधेयक, १९७०.
१३. नागपूर सुधार न्यास अधिनियम यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.
१४. गलिच्छ वस्ती निर्मूलन विधेयक, १९७०.
१५. महाराष्ट्र कृषि उत्पादन पणन (नियमन) (सुधारणा) विधेयक, १९७०.
१६. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सुधारणा) विधेयक, १९७०.
१७. मुंबई खार जमिनी (सुधारणा) विधेयक, १९७०.
१८. राज्यातील राष्ट्रीय उद्याने व राज्य उद्याने विधेयक, १९७०.
१९. महाराष्ट्र देवस्थान इनामे नाहीशी करणे व देवस्थान इनामी जमिनी (जमिनींचे पुनर्ग्रहण व त्या परत देणे) विधेयक, १९७०.
२०. मुंबई विद्युत् शुल्क अधिनियम, १९५८ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.
२१. पुणे विद्यापीठ अधिनियम यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

२६. सन्माननीय सदस्य, राज्यातील प्रमुख घडामोडींचे सर्वांगीण चित्र मी आपणासमोर मांडले आहे. शासनाच्या वैधानिक व कार्यकारी शाखांमधील हार्दिक व सलोख्याचे संबंध ही महाराष्ट्र विधानमंडळाची उच्च परंपरा आहे. संसदीय लोकशाही पद्धतीच्या यशाचे व भरीवपणाचे अशी परंपरा हे मुख्य द्योतक आहे. सभेची फार मोठी कार्यसूची आपणासमोर आहे, आणि आपली चर्चा व आपले कामकाज ही महाराष्ट्रातील जनतेला सर्वतोपरी हितकारक ठरतील, अशी मला दृढ आशा आहे.

* * *